महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@ gov.in

क्रमांक:- संकीर्ण -२०२५/प्र.क्र. १३०/साशि                दिनांक:-१९ डिसेंबर, २०२५.

प्रति,

१. संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, (ग्रंथालय), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. कुलसचिव, ( सर्व अकृषी विद्यापीठे), महाराष्ट्र राज्य.

क.का. संस्कृत विश्वविद्यालय
आवक क्रमांक 526
दिनांक 20 DEC 2025

**विषय- दि. २६ डिसेंबर, २०२५ रोजी वीर बाल दिवस साजरा करण्याबाबत.**

महोदय,

सोबत सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहीलेले दिनांक १०/१२/२०२५ चे पत्र व सहपत्र जोडले आहे.

२. भारताच्या भविष्याचा पाया म्हणून मुलांना सन्मानित करण्यासाठी, केंद्र शासनाच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाने दि. २६ डिसेंबर २०२५ हा दिवस देशभरात वीर बाल दिवस (VBD) आयोजित करण्याचे ठरविले आहे. याकरीता राज्य आणि ज़िल्हा स्तरावरील कार्यक्रमांच्या मालिकेद्वारे वीर बाल दिवस (VBD) साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

३. या संदर्भात, राज्यामध्ये वीर बाल दिवस व्यापक स्वरुपात साजरा करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, क्रीडा संस्था, बालसंगोपन संस्था, अंगणवाडी केंद्रे, पूर्व-शाळा/बालपण शिक्षण केंद्रे, अपंग मुलांसाठी विशेष शाळा, बालगृहे, निरीक्षण गृहे, अनाथाश्रमे, युवा क्लब, सामुदायिक शिक्षण केंद्रे इत्यादी सर्व संस्थांना सहभागी करण्याच्या सूचना उपरोक्त पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

४. त्यानुसार, दिनांक १०/१२/२०२५ रोजीच्या सोबतच्या प्रपत्रात देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालय/ विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा तसेच कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत, ही विनंती.

आपली,

सं.चं.जाधव

( संचिता जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सोबत : वरीलप्रमाणे**

प्रत,

१. निवडनस्ती. (सा.शि)

C:\Users\Vishal.Tathe\Desktop\Varada Haryan\वरदा\०१.०१.२०२४ पासून\०१.०१.२०२५ New\प्र.क्र.१३०-२५ वीर बाल दिवस.Docx